**ज्योतिषविषयक**

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, ९ इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

DIRECT ADMISSION
MBBS | MD | MS | BDS | MDS
BAMS | BUMS | BHMS
PANCHAKARMA
DERMATOLOGY | NURSING
PHARMACY
PHYSIOTHERAPY
PARAMEDICAL | VETERINARY
OPHTHALMOLOGY | FMGE
Indo Abroad Education
9326134770

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १७२ वा | सोमवार, दि.०९ फेब्रुवारी २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# आज निकाल; सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणाची दिशा ठरणार

## मिनीमंत्रालयावर कोणाची सत्ता येणार याकडे जिल्ह्याचे लक्ष

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी शनिवारी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत शांततेत व उत्साहात मतदान प्रक्रिया पार पडली. सर्वच तालुक्यांत चुरशीचे वातावरण असून सरासरी सुमारे ७० टक्के मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज निवडणूक प्रशासनाने व्यक्त केला आहे. उशिरापर्यंत मतदानाची अंतिम टक्केवारी नोंदविण्याचे काम सुरू होते.




या निवडणुकीत जिल्हा परिषद गटासाठी २७१ उमेदवार, तर पंचायत समिती गणासाठी ४८५ उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये बंद झाले आहे. सोमवारी मतमोजणी होणार असून जिल्हा परिषदेत सत्ता कोणाची येणार याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

**महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

सकाळपासून मतदान केंद्रांवर मतदारांच्या रांगा लागल्या होत्या. विशेषतः महिलांचा सहभाग लक्षणीय होता. अनेक ठिकाणी तरुण मतदारांनीही मोठ्या प्रमाणात मतदानाचा हक्क बजावला.

**काही ठिकाणी किरकोळ प्रकार**

माढा तालुक्यातील काही मतदान केंद्रांवर सकाळी ईव्हीएम मशिनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने काही काळ गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. मात्र तात्काळ मशिन बदलण्यात आल्याने मतदान प्रक्रिया सुरळीत सुरू झाली.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी गटातील मुळेगाव येथील मतदान केंद्रावर अज्ञात व्यक्तीने ईव्हीएम मशीनच्या शेजारी लिंबू-मिरची ठेवल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे काही काळ मतदान प्रक्रिया थांबविण्यात आली. निवडणूक अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली.

माळशिरस तालुक्यातील अकलूज येथील मतदान केंद्रावर एका राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्याने आपल्या अल्पवयीन मुलाला मतदान यंत्राचे बटन दाबण्यास सांगितल्याचा आरोप झाला. यावर विरोधी उमेदवार व कार्यकर्त्यांनी आक्षेप घेत निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

**शहरातील मतदारांसाठी विशेष व्यवस्था**

ग्रामीण भागातील उमेदवारांनी शहरात वास्तव्यास असलेल्या मतदारांना मतदानासाठी आणण्यासाठी विशेष वाहतुकीची व्यवस्था केली होती. त्यामुळे मतदानाची टक्केवारी वाढण्यास मदत झाली. सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदानाची वेळ असली तरी मतदान केंद्रात वेळेत प्रवेश केलेल्या मतदारांना मतदानाची मुभा देण्यात आली. त्यामुळे काही मतदान केंद्रांवर सायंकाळी ६.२५ वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया सुरू होती.

**६८ जिल्हा परिषद व १३६ पंचायत समिती सदस्यांची निवड**

या निवडणुकीत जिल्हा परिषदेच्या ६८ सदस्यांचा तसेच पंचायत समितीच्या १३६ सदस्यांचा फैसला मतदारांनी मतदानातून केला आहे.

**मिनीमंत्रालयावर कोणाची सत्ता ?**

मिनीमंत्रालय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत यंदा विविध पक्षांचे मोठ्या संख्येने उमेदवार रिंगणात आहेत.

- भाजप – ५९ उमेदवार
- राष्ट्रवादी काँग्रेस ( अजित पवार गट) – २६
- राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) – २४
- शिवसेना (शिंदे गट) – २२
- काँग्रेस – १८
- वंचित बहुजन आघाडी – ६

भाजप पुन्हा एकदा सत्ता मिळवणार की स्थानिक आघाडीला संधी मिळणार, याचा फैसला सोमवारी होणाऱ्या मतमोजणीत स्पष्ट होणार आहे. त्यामुळे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष निकालाकडे लागले आहे.

## राज्य उत्पादन शुल्कच्या कारवाईत १ कोटी ११ लाखांचा मुद्देमाल जप्त

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आचारसंहिता कालावधीत शहर - जिल्हा परिसरातील संयुक्त कारवाईत अवैध बनावट देशी, विदेशी मद्य व गोवा राज्य निर्मित विदेशी मद्य हातभट्टी दारु निर्मिती, विक्री वाहतुकीवर केलेल्या धडक कारवाईत रुपए ०१ कोटी ११ लाख ५६२ चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



दि. १६ जानेवारी ते ०६ फेब्रुवारी २०२६ या आचार्संहिता कालावधीमध्ये एकुण १९५ गुन्हे नोंद करण्यात आले असुन १८४ जणांवर कारवाई करण्यात आली आहे, सदरच्या कारवाईत ६८,११० लि. रसायन, ३९५० ली. हातभट्टी दारु, ८३७ ब. लि. देशी मद्य, ४०९ ब.लि. विदेशी मद्य, १९८७ ब.ली. परराज्यातील विदेशी मद्य, १९,८०० बनावट बुचे, ८६ ब.लि. बिअर, १०१९ ली. ताडी, १०८ब.ली. वाईन, २४० किलो गुळ पावडर, तसेच ०६ चारचाकी वाहन व १४ दुचाकी वाहनांसहं एकुण रुपए ०१ कोटी ११ लाख ५६२ चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. २९ जानेवारी ते ०६ फेब्रुवारी २०२६ या कालवधीमध्ये निरीक्षक भरारी पथक क्र.२ या कार्यालयाने माढा तालुक्यातील टेंभुर्णी येथे कारवाई करुन ५४० ब.लि (६० बॉक्सेस) गोवा परराज्यातील विदेशी मद्याची वाहतुक करणाऱ्या एक चारचाकी वाहनासह एकुण रुपये १६,७०,०००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन एक आरोपी अमोल वसंत खटके रा. तांबवे ता. माढा यास अटक करण्यात आली आहे.

निरीक्षक कुडुवाडी विभाग सोलापूर या कार्यालयाने बार्शी तालुक्यातील मौजे शेळगाव येथे अवैध गोवा परराज्यातील २२५ ब.ली. (१६ बॉक्सेस) विदेशी मद्य तसेच २००० बनावट बुचे ईत्यादीची वाहतुक करणाऱ्या एक चारचाकी वाहनासह एकुण रुपये ५,७४,०००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन एक आरोपीस अटक करण्यात आली आहे. या विभागाकडुन अवैध मद्य विक्री करणाऱ्या व मद्य पिण्यास परवानगी देणा-या एकूण ६ ढाब्यांवर गुन्हे नोंदविण्यात आले असून एकुण १८ आरोपींवर कारवाई करण्यात आलेली आहे.

सदर कारवाई आर.एम. चवरे, व्ही घाटगे, राकेश पवार पंकज कुंभार, सचिन भवड, तसेच दुय्यम निरीक्षक गणेश कुदळे, सुमित भोसले पी.जी. कदम, नेवसे बहुधाने, अमित नागरे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, संजय चव्हाण, आनंद जोशी, एस, ए. बिराजदार जवान चेतन व्हनंगुटी, प्रशांत इंगोले, योगीराज तोग्गी, रेवणसिद्ध कांबळे, टेळे, आबा कसबे, दिनकर शिंदे, आर एस. लोखंडे, अशोक माळी, प्रसन्ना साळुंके, योगेश पाटील पुसावळे, चौधरी, बाबासाहेब जाधव. कपिल स्वामी, गजानन ढब्बे, तानाजी जाधव, पवन उगले, स्वप्निल आरमाळ, योगेश गाडेकर, पंढरीनाथ भुतेकर, मंगेश मारसिंग, महिला जवान क्ल्पना जाधव, शिवानी मुढे, वाहनचालक, संजय नवले, रशीद शेख, मारुती जडगे वदिपक वाघमारे यांनी पार पाडली.

## सोलापुर जिल्ह्यात १६ फेब्रुवारीपासून होणार 'व्याघ्र गणना'

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** देशभर सध्या 'अखिल भारतीय व्याघ्र गणना' सुरू असून, सोलापूर जिल्हाही या मोहिमेसाठी सज्ज झाला आहे. १९ ते २४ जानेवारी दरम्यान वाघांच्या पदचिन्हांची शोधमोहीम यशस्वीपणे पूर्ण झाल्यानंतर, आता दुसऱ्या टप्प्यात १६ फेब्रुवारीपासून 'इन कॅमेरे' मोजणी केली जाणार आहे.



या प्रक्रियेसाठी जिल्ह्यात एकूण ४५ ठिकाणी ट्रॅप कॅमेरे लावले जाणार असल्याची माहिती सहायक वनसंरक्षक अजित शिंदे यांनी दिली.गेल्या दीड वर्षांपासून सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात पट्टेरी वाघाचा वावर सातत्याने दिसून येत आहे.

धाराशिवमधील येडशी अभयारण्य क्षेत्रात असलेला हा वाघ बार्शी तालुक्यातील वैराग परिसरापर्यंत पोहोचला होता. या वाघाने वैराग आणि माढा तालुक्यातील धानोरे परिसरात हल्ले केल्याच्या घटनाही घडल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर बार्शीसह मोहोळ, माढा आणि उत्तर सोलापूर या तालुक्यांतील हालचालींवर वनविभाग बारकाईने लक्ष ठेवून आहे. केवळ पट्टेरी वाघच नव्हे, तर जिल्ह्यातील अनेक तालुक्यांत बिबट्यांचा वावरदेखील मोठ्या प्रमाणात आढळला आहे. त्याचे निरीक्षण यातून होणार आहे. बिबट्यांच्या वाढत्या संख्येमुळे आणि पट्टेरी वाघाच्या भटकंतीमुळे सोलापूर जिल्ह्यातील ही व्याघ्र गणना वनविभागासाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

**...अशी होणार मोजणी**

वनविभागाच्या या मोहिमेचा पहिला टप्पा (१९ ते २४ जानेवारी) पूर्ण झाला असून, यामध्ये वनाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जंगलात जाऊन पावलांच्या ठशांचे निरीक्षण केले आहे. आता १६ फेब्रुवारीपासून तंत्रज्ञानाचा वापर करून 'ट्रॅप कॅमेऱ्याच्या' माध्यमातून वन्यजीवांची अधिकृत नोंद केली जाईल, हे कॅमेरे अशा ठिकाणी लावले जातील जिथे वन्यप्राण्यांचा वावर किंवा पाण्याचे स्रोत अधिक आहेत.

## राष्ट्रवादी आमदार-खासदाराचा पोलिस ठाण्याच्या पायऱ्यांवरच ठिय्या

### पक्ष कार्यकर्त्याला मारहाणीचा आरोप



**माळशिरस (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषदेच्या 68 जागा आणि अकरा पंचायत समितीच्या 136 जागांसाठी आज (ता. 07 फेब्रुवारी) चुरशीने मतदान झाले. सकाळी साडेसातपासून सायंकाळी साडेपाचपर्यंत 58.39 टक्के मतदान झाले आहे.

साडेपाचनंतरही काही मतदान केंद्रांवर मतदारांच्या रांगा होत्या, त्यामुळे यात वाढ होऊ शकते.

दरम्यान, वेळापूर पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी श्री गोसावी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (NCP) कार्यकर्त्यांना मारहाण केल्याचा आरोप करत पोलिस ठाण्याच्या पायऱ्यांवर खासदार धैर्यशील मोहिते पाटील आणि आमदार उत्तम जानकर यांनी ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. ते रात्री साडेआठपर्यंत सुरू होते. या वेळी राष्ट्रवादीचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात पोलिस ठाण्याच्या आवारात जमा झाले होते.

माळशिरस तालुक्यात माजी आमदार राम सातपुते यांच्या नेतृत्वाखाली भाजप (BJP) स्वबळावर झेडपी आणि पंचायत समितीच्या निवडणुका लढवत आहे. त्यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाबरोबर लढत होत आहे. विशेषतः दोन्ही राष्ट्रवादी या वेळी एकत्र आलेल्या आहेत. त्यामुळे माळशिरसमध्ये तुल्यबळ लढत होताना दिसत आहे.

माळशिरस तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना वेळापूर पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी श्री गोसावी यांनी मारहाण केल्याच्या निषेधार्थ सुरुवातीला आमदार उत्तम जानकर यांनी पोलिस ठाण्याच्या पायऱ्यांवर आंदोलनाला सुरुवात केली. या वेळी कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात पोलिस ठाण्याच्या आवारात जमा झाले होते.

आमदार जानकर यांच्यानंतर राष्ट्रवादीचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनीही वेळापूर पोलिस ठाणे गाठले. त्यानंतर आमदार आणि खासदारांनी पोलिस ठाण्याच्या पायऱ्यांवर बसून ठिय्या आंदोलनाला सुरुवात केली. ते रात्री उशिरापर्यंत सुरू होते. कार्यकर्त्यांनीही पोलिसांच्या निषेधार्थ जोरदार घोषणाबाजी केली.

दरम्यान, खासदार धैर्यशील मोहिते पाटील आणि आमदार उत्तम जानकर यांच्याशी पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी संवाद साधला. त्यांनी मारहाणीची चौकशी करण्यात येईल, आमदार-खासदारांनी ठिय्या आंदोलन मागे घ्यावे, अशी विनंती केली. अधीक्षकांच्या विनंतीनंतर मोहिते पाटील आणि जानकर यांनी आंदोलन मागे घेतले.

## मतदानानंतर ईव्हीएम मशीन मिळाल्या ढाब्यावर!

### निवडणूक आयोगाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह ?

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार – SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार – SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL – HATCHBACK RS. 2500/- | SEDAN - 3000/- | SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG – RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
Exclusive showroom of Second Hand Car Sales & Service
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समितींसाठी निवडणूक पार पडली. ७ जानेवारी रोजी मतदान झाल्यानंतर सोलापूर जिल्ह्यात एका ढाब्यावर ३ ईव्हीएम मशीन आढळून आल्याने खळबळ उडाली. हा प्रकार समोर आल्यानंतर निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्न उपस्थित केले जात आहेत.



उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनीही तीन ईव्हीएम मशीन आढळून आल्याच्या प्रकाराला दुजोरा दिला आहे. या मशीन मतदानासाठी वापरल्या गेलेल्या नाहीत, असे त्यांनी सांगितले.

सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ मतदारसंघात हा प्रकार घडला आहे. मोहोळ शहराजवळ असलेल्या एका ढाब्यावर ईव्हीएम मशीन आढळून आल्या. राष्ट्रवादी काँग्रेस ( अजित पवार) पक्षाचे नेते उमेश पाटील यांनी हा प्रकार समोर आणला. स्वराज्य बार अँड हॉटेल परिसरात संशयास्पद प्रकार सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर उमेश पाटील कार्यकर्त्यांसह तिथे पोहोचले होते.

**उपजिल्हाधिकारी ईव्हीएम मशीन सापडल्यानंतर काय बोलले ?**

मोहोळमधील या प्रकारावर उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख म्हणाले, "मशीन ढाब्यावर आढळणे हा प्रकार दुर्दैवी आणि गंभीर आहे. या प्रकरणी आम्ही संबंधितांवर कारवाई करणार आहोत. आढळून आलेल्या ईव्हीएम मशीन अतिरिक्त होत्या. त्या मतदानासाठी वापरण्यात आलेल्या नाहीत", असा खुलासा त्यांनी केला. "झोनल अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त दोन मशीन ठेवण्यात आल्या होत्या. मात्र, वाहन चालक आणि अधिकारी यांच्यात संवाद न झाल्याने हा प्रकार घडला असावा. त्या मशीन स्ट्राँग रुममध्ये स्वतंत्र खोलीत ठेवण्यात आल्या आहेत", अशी माहिती त्यांनी दिली.

**ईव्हीएम नेण्यासाठी बस किंवा वाहन असते -अंबादास दानवे**

विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले की, "ईव्हीएम मशीन नेण्यासाठी एसटी असते किंवा एखादे वाहन नेमण्यात आलेले असते. ईव्हीएम मशीन ढाब्यावर सापडले आता काय कारणे देणार ? ईव्हीएम बद्दल वारंवार शंका उपस्थित होत आहे. यात निवडणूक आयोग काही तरी करून सत्ताधारी पक्षाला मदत करत असतो", असा गंभीर आरोप दानवे यांनी केला आहे.

## राज्यात ६० हून अधिक ठिकाणी ईव्हीएममध्ये बिघाड; मतदारांना फटका

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील १२ जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी आज मतदान प्रक्रिया पार पडली. लोकशाहीच्या या उत्सवात नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला असला, तरी अनेक ठिकाणी निवडणूक यंत्रणेच्या ढिसाळ नियोजनाचा फटका मतदारांना बसला.



राज्यभरात ६० हून अधिक मतदान केंद्रांवर ईव्हीएम मशीनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याच्या तक्रारी समोर आल्याने निवडणूक प्रशासनाच्या सज्जतेवर आता गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. निवडणूक प्रक्रियेत सर्वाधिक अडथळे रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यात पाहायला मिळाले.

तालुक्यातील सुमारे ४० ते ४५ केंद्रांवर मतदान यंत्रे अचानक बंद पडल्याने मतदारांचा खोळंबा झाला. खेर्डी जिल्हा परिषद गटातील पाच केंद्रांवर यंत्रे निकामी झाल्याने मतदारांना रांगेतच उभे राहावे लागले. शिरगाव येथे सकाळी दोन यंत्रे तासभर बंद होती, तर सावर्डे कॉलनीमध्ये सकाळी ९ वाजताच यंत्रात बिघाड झाला.

कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र- रायगड जिल्ह्यातील अलिबाग (सहाण केंद्र) येथे मतदान सुरू होण्यापूर्वीच यंत्रात बिघाड झाला. सोलापूरच्या माळशिरस तालुक्यातील यशवंतनगर आणि सातारा जिल्ह्यातील कराडमधील चचेगाव येथेही सुरुवातीच्या काळात मतदान प्रक्रिया विस्कळीत झाली होती.

सांगलीतील चिकुर्डे गटातही देवर्डे केंद्रावर काही काळ मतदान थांबले होते. छत्रपती संभाजीनगरमधील वाळूज येथील मतदान केंद्रावर दोन यंत्रे बदलावी लागली. धाराशीव- तुळजापूर तालुक्यातील शिंदफळ गटातील शिरढोण येथे यंत्रातील बिघाडामुळे मतदानाला विलंब झाला.

## संपादकीय

# घाबरण्याऐवजी उत्तर देवून हिंमत दाखवण्याची...

संसद, विरोधक आणि लोकशाही : प्रश्न विचारण्याचा अधिकार की सत्तेला होणारी अस्वस्थता ?

लोकशाहीचा आत्मा केवळ निवडणुकांमध्ये नसतो; तो जिवंत राहतो संसदेत होणाऱ्या चर्चेत, विरोधकांच्या प्रश्नांत आणि सत्तेने दिलेल्या उत्तरांत. संसद ही केवळ कायदे मंजूर करण्याची यंत्रणा नाही, तर ती देशाच्या सामूहिक विवेकाची कसोटी असते.

लोकशाही व्यवस्थेत विरोधकांची भूमिका सत्तेइतकीच महत्त्वाची असते. कारण विरोधक म्हणजे शत्रू नसतो; तो सत्तेचा आरसा असतो. त्या आरशात दिसणारे प्रतिबिंब कधी अप्रिय असते, कधी बोचरे असते. पण ते खरे असते. जेव्हा सत्तेला तो आरसा पाहण्याची सवय राहत नाही, तेव्हा लोकशाही कमकुवत होऊ लागते.

आज संसदेत विरोधक प्रश्न विचारतात, चर्चा मागतात, मुद्दे उपस्थित करतात आणि त्याला अडथळा, धोका, गोंधळ म्हणून रंगवले जाते. हीच बाब चिंताजनक आहे. कारण प्रश्न विचारणे ही लोकशाहीतील बंडखोरी नाही; ती मूलभूत जबाबदारी आहे. संसदेत वाद होतात, गदारोळ होतो हे नवीन नाही. भारताच्या संसदीय इतिहासात नेहरू, इंदिरा गांधी, अटलबिहारी वाजपेयी यांच्यासह अनेक पंतप्रधानांनी कडव्या विरोधाचा सामना केला आहे. त्यावेळीही संसदेत शब्दयुद्धे झाली, घोषणाबाजी झाली; पण त्याला कधीही लोकशाहीवरील धोका मानले गेले नाही. उलट, ती लोकशाहीची ताकद मानली गेली.

मात्र आज परिस्थिती बदललेली दिसते. सत्तेला अस्वस्थ करणारे प्रश्न वैयक्तिक हल्ला मानले जातात. विरोधकांची भूमिका राष्ट्रविरोधी ठरवली जाते. यामुळे संसदेत संवादाऐवजी संशय वाढतो आणि चर्चेऐवजी टोकाची भूमिका घेतली जाते.

लोकशाहीत सत्ता मजबूत असते ती बहुमतामुळे नव्हे, तर टीकेला सामोरे जाण्याच्या क्षमतेमुळे. जे सरकार प्रश्नांना घाबरते, ते प्रत्यक्षात प्रश्नांमागील सत्याला घाबरत असते. आणि सत्याला घाबरणारी सत्ता दीर्घकाळ विश्वास निर्माण करू शकत नाही.

विरोधकांनाही आत्मपरीक्षणाची गरज आहे. विरोध हा केवळ गोंधळ घालण्यासाठी नसतो; तो मुद्देसूद, तथ्याधारित आणि लोकहितासाठी असला पाहिजे. संसद बंद पाडणे हा शेवटचा पर्याय असावा, पहिला नव्हे. कारण संसद ठप्प झाली की सर्वात मोठा तोटा जनतेचा होतो.

पण त्याचवेळी, सत्तेनेही हे मान्य केले पाहिजे की विरोधकांचा आवाज दाबणे म्हणजे स्थैर्य निर्माण करणे नव्हे, ते अस्थिरतेची बीजे पेरणे असते. लोकशाहीत प्रश्न बाहेर पडले नाहीत, तर ते रस्त्यावर उतरतात. आणि तेव्हा संवादाऐवजी संघर्ष उरतो.

आज खरा प्रश्न हा नाही की संसदेत गोंधळ होतो का.

खरा प्रश्न हा आहे, सत्तेला विरोधकांची गरज वाटते का जर संसद केवळ औपचारिक ठरावांची जागा बनली, जर विरोध फक्त सहन केला गेला, स्वीकारला गेला नाही, आणि जर प्रश्न विचारणे धोकादायक ठरू लागले, तर लोकशाही केवळ नावापुरती उरते.

लोकशाही ही शांततेने चालणारी व्यवस्था नाही; ती प्रश्नांनी, संघर्षांनी आणि चर्चांनी चालते. संसद हा त्या संघषार्चा सुसंस्कृत मंच आहे. तो बंद झाला, तर लोकशाहीची नाडी मंदावते. म्हणूनच आज गरज आहे अधिक सहनशीलतेची, अधिक संवादाची, आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे प्रश्नांना घाबरण्याऐवजी उत्तर देण्याची राजकीय हिंमत दाखवण्याची. कारण लोकशाहीत सत्ता प्रश्नांमुळे कमकुवत होत नाही ती प्रश्नांना उत्तर देऊ शकली नाही, तेव्हा कमकुवत होते.

# भीतीची सत्ता आणि लोकशाहीचा प्रश्न

जर उद्या एखादे न्यायमूर्ती म्हणाले की, 'माझ्या जीवाला धोका आहे म्हणून आता मी फक्त बंदिस्त खोलीतून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारेच सुनावण्या घेणार', जर डॉक्टर म्हणाले की, 'रुग्ण तपासणी आता कंपाऊंडरमार्फतच होईल', आणि शिक्षकांनी जाहीर केले की, 'विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शिकवणे धोकादायक आहे, त्यामुळे घरी बसून यूट्यूबवरूनच शिक्षण देऊ' तर आपण हे सगळं कोणत्या नावाने ओळखायचं ? उत्तर सोपं आहे, भीतीचं राज्य.

आज देशाच्या सर्वोच्च सभागृहात, म्हणजेच संसदेमध्ये, जर थेट देशाच्या पंतप्रधानांना 'धोका आहे', 'डर वाटतो' असा सूर उमटत असेल, तर प्रश्न पंतप्रधानांचा वैयक्तिक नाही, तर लोकशाहीच्या आत्मविश्वासाचा आहे. संसद ही वाद, चर्चा, विरोध आणि प्रश्नांसाठी असते. तिथे भीती असू नये तिथे उत्तरदायित्व असायला हवे.

आज सोशल मीडियावर सुरू असलेली उपरोधिक भाषा, टोमणे, उपहास यामागे केवळ टवाळकी नाही; ती एक गंभीर चिंता व्यक्त करत आहे. जर देशाचा प्रमुखच म्हणत असेल की संसदेत वातावरण असुरक्षित आहे, तर सामान्य नागरिकाने सुरक्षिततेसाठी कोणाकडे पाहायचे ?

ही भीती नेमकी कुणाची आहे ? विरोधकांची ? प्रश्न विचारणाऱ्यांची ? की उत्तर देण्याची सवय नसलेल्या सत्तेची ?

राजकारणात विरोधकांना पप्पू म्हणणे, देशद्रोही ठरवणे, किंवा धोकादायक ठपके लावणे ही जुनीच पद्धत आहे. पण प्रश्न असा आहे की, आज विरोधक बदलले की सत्तेची सहनशक्ती संपली ?

नेहरू–इंदिरा गांधींवर सगळा दोष टाकणे हा आता सोयीचा उद्योग झाला आहे. आजच्या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर 'हा सगळा खेळ नेहरूंचा आहे' असं सांगणं म्हणजे वर्तमानात अपयशी ठरल्याची कबुलीच आहे.

सोशल मीडियावर पंतप्रधानांची खिल्ली उडवू नका, ते 'प्युअर' आहेत, ते पळून जातील अशी विधाने विनोद वाटू शकतात. पण त्यामागचा रोख गंभीर आहे. कारण लोकशाहीत नेता पूज्य नसतो, तो जबाबदार असतो.

जर संसदेत प्रश्न विचारणे म्हणजे दहशत, जर टीका म्हणजे धोका, आणि जर विरोध म्हणजे राष्ट्रद्रोह, तर मग लोकशाही उरते कुठे ?

आज देशाला हा प्रश्न पडतो आहे. जर पंतप्रधानांनाच संसदेत भीती वाटत असेल, तर सामान्य जनतेने धीर कुठून घ्यायचा ?

भीतीवर चालणारी सत्ता इतिहासात कधीही टिकलेली नाही. लोकशाही विश्वासावर उभी असते आणि विश्वास भीतीने नव्हे, संवादाने आणि उत्तरदायित्वाने मिळतो.

# १० वी १२ वी परीक्षा महत्वाचीच... मंग तयारीला लागा...



देशपातळीवर शिक्षणक्षेत्रात महाराष्ट्राची Oxford of the East अशी ख्याती असलेले, सक्षम व भक्कम पिढी, चांगला नागरीक, समाज निर्माण करण्याचे व घडविण्याचे कार्य अभ्यासाबरोबर करत असलेल्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने नुकतीच इयत्ता १० वी व १२ वी बोर्ड परीक्षेचे वेळापत्रक जाहिर केलेले आहे.

"तसमो मा ज्योतिर्गमय" हे राज्यमंडळाचे ब्रीद वाक्य म्हणजे अंधारातून प्रकाशाकडे जा. या ध्येयाबरोबरच नेमके ध्येय, अचूक निर्णय आणि काटेकोर अमंलबजावणी ही त्रिसुत्री राज्यमंडळाची आहे. विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अत्यंत महत्वाच्या वयास व व्यक्तिमत्वास आकार देण्याचे कार्य करून बौद्धिक, मानसिक व भावनिक विकास करते. विद्यार्थी मित्रांनो शैक्षणिक गुणवत्ता ही विकासाची पावले निश्चित करते तर परीक्षा हे बुद्धिमापनाचे कौशल्य विकसित करते. Examination is the process of Evaluation in the learning method for the students life. विद्यार्थी जीवनात परीक्षा हे एक आत्मविश्वास, निर्भयता आणि संयम याचे प्रतीक समजले जाते. परंतु परीक्षा म्हटलं की टेन्शन येतंच. तीही बोर्डाची. ज्या विद्यार्थ्यांची तयारी चांगली चालू आहे आणि ज्यांनी अजून अभ्यासाला सुरवात केली नाही अशा दोघांनाही परीक्षेचं टेन्शन येतं. आज स्पर्धेच्या युगात हा शब्द भल्याभल्यांना घाबरवतोय. आता जरा कसंतरी होतंय ना ? एक अनामिक मिती किंवा दडपण वाटत असेल ना ? जगात सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेची मिती आणि टेन्शन येतं पण मित्रांनो कोणतीही परीक्षा तुम्हाला तोपर्यंत नापास करू शकत नाही तोपर्यंत तुम्ही स्वतःला नापास करत नाही. त्यामुळे मनातून मिती काढून टाका. जगण्याच्या भरधाव रस्त्यावरील ही एक परीक्षा तुम्हाला पार करायची आहे. परीक्षेच्या फूटपट्टीने मोजावे एचडे तुम्ही किरकोळ नाही. परीक्षा म्हणजे काहीतरी भयंकर, त्रास देण्यासाठी केलेली गोष्ट नाही. तर वर्षभर केलेल्या अभ्यासाचे फळ पदरात टाकणारी एक आवश्यक गोष्ट आहे. कोणत्याही क्षेत्रात व कामात जितके नियोजन उत्तम, तितकीच यशाची खात्री अधिक असते. अभ्यासाबाबतही हे तितकेच खरे आहे.

१. वेग, वेळ व सरावाचे नियोजन परीक्षा जेमतेम महिन्यावर येऊन ठेपलेली असताना आता आपल्याला वेळेचे नियोजन करायला हवे. अभ्यासाचे नियोजन करताना वाचन, स्मरण आणि लेखनाचा वेग वाढवण्यासाठी वेळेची खास तरतूद करणे योग्य ठरेल. वाचायला पुरेसा वेळ मिळाला नाही किंवा उत्तरपत्रिका लिहून झाली नाही व येत होतं पण आयत्या वेळी विसरायला झालं या साऱ्या सबबीमागचं सत्य एकच असतं की, आपला वेग आणि सराव कमी पडला. असे होऊ नये म्हणून आतापासूनच वेग, वेळ व सरावाचे नियोजन करा.

२. उद्दिष्ट ठरवा इयत्ता १० वी १२ वी मध्ये चांगले यश मिळवायचे हे तर उद्दिष्ट आहेच पण त्यासाठी ठरलेल्या वेळेत किंती प्रश्नांची उत्तरे झाली पाहिजेत हे निश्चित करा. तुम्हाला कुठे जायचे आहे याचे ते बीज आहे, परीक्षेच्या तीन तासाचे नियोजन करा. जे काही करायचे आहे ते उद्दिष्टानुसार करा.

३. स्वतःला समजावून सांगा जे काही वाचले आहे ते आत्मसात करायचे असेल तर ते सविस्तर स्वतःलाच समजावून सांगा. वेळ मिळेल त्यावेळेस प्रत्येक मुद्याचे चिंतन, मनन करा. प्रत्येक मुद्याची पुन्हा पुन्हा मनात उजळणी केल्याने आपल्याला व्यवस्थित उत्तरपत्रिका लिहिता येईल असा आत्मविश्वास तुम्हाला येईल. स्वतःचा शिक्षक स्वतःच व्हा. ४. मोठ्या आवाजात वाचा काहीजण अतिशय शांतपणे तर काहीजण मनातल्या मनात वाचत अभ्यास करतात त्याऐवजी मोठ्या आवाजात उत्तरे, धडे, नोट्स वाचल्या तर जास्त चांगल्या प्रकारे लक्षात राहतात. कारण मोठ्थाने वाचल्याने एकाग्रता वाढून ती उत्तरे लक्षात राहतात. मोठ्याने वाचा व ऐका कारण ऐकलेल्या गोष्टी बऱ्यापैकी लक्षात राहतात. मोठ्धाने वाचल्याने मन भरकटण्याची किंवा मनात अन्य विचार येण्याची शक्यता कमी असते.

५. सराव करा – मागील पाच वर्षाच्या प्रश्नपत्रीका सोडविल्या पाहिजेत कारण एखाद्या ठिकाणी जायचं असेल आणि तुम्हाला रस्ता माहित नसेल तर तुम्ही विचारत विचारत जाता किंवा कुणी जाऊन आले असेल तर त्यास विचारतो. तसंच मागील वर्षाच्या प्रश्नपत्रीका सोडविल्यामुळे प्रश्नपत्रीकेचा एक अंदाज येऊन परीक्षेचं स्वरूप, टप्पे, पात्रता, प्रश्नाची काठीण्य पातळी ह्या बाबी माहिती होतात. प्रश्नपत्रीका सोडविल्यामुळे लिखानाचा सराव होतो. अक्षर सुधारून अभ्यासाला योग्य दिशा मिळेल. लिहिलेल्या बऱ्यापैकी गोष्टी लक्षात राहतात.

६. अभ्यासात ब्रेक घ्या – केवळ अभ्यास एके अभ्यास असे न करता अधूनमधून ब्रेक घ्या. शरीराचं चलन वलन झालं की रक्ताभिसरण चांगलं होतं व कंटाळा येत नाही. सतत अभ्यास केल्याने मेंदू थकतो त्यामुळे दीड दोन तासानंतर दहा मिनिटे ब्रेक घ्या.

७. आधुनिक साधनांचा वापर करा सध्याच्या काळात शिकण्यासाठी इंटरनेटची मदत हा मुलांसमोर पर्याय उपलब्ध आहे. अनेक प्रश्नांची उत्तरे कशी लिहायची, गणित कसे सोडवायचे, विज्ञानातील विविध संकल्पना हे व्हिडीओद्वारे समजावून घेता येते. कुठलीही गोष्ट दृकश्राव्य साधनांच्या सहाय्याने पाहिल्यास चांगले लक्षात रहाते. मोबाईल, टी.व्ही. इंटरनेट याचा वापर सकारात्मक व अभ्यासाला पुरक असावा.

८. चर्चा करा वर्गात शिकविलेले व तुम्ही घरी केलेला अभ्यासाची चर्चा आपल्या मित्रांबरोबर नेहमी करत जावा. त्यामुळे उत्तरे लक्षात राहतील. एखादी संकल्पना, गोष्ट समजली नसेल तर वर्गात स्पष्ट शिक्षकांना विचारा. लाजू नका. त्यावरती चर्चा करा. चर्चा नेहमी हुशार मुलांबरोबर करा.

डोळ्यासमोर कायम मोठं ध्येय असेल तर तुम्ही यशस्वी होणारच. मूळ उद्देशापासून कधीच भरकटू नका. अभ्यासाशिवाय पर्याय नाही. अभ्यास करून चांगले करिअर करणे हा उद्देश असला पाहिजे. चला तर विद्यार्थी मित्रांनो वरील सर्व मुद्दे लक्षात घेऊन आनंदाने व विश्वासाने परीक्षेला सामोरे जाण्यासाठी अभ्यासाला लागा. मुलांनो छोट्या योजना आखू नका माणसांच रक्त सळसळवायची जादू त्यात नसते. मला खात्री आहे तुम्ही अभ्यास वेळेत पूर्ण करणारचं...... या वर्षा तुम्हाला चांगले मार्क मिळणारच... तुम्ही जिंकणारच..... सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा

**प्रा. काटकर तात्यासाहेब शिवाजी**
९२२६१४४८३६
सदाशिवराव माने विद्यालय, अकलूज (उच्च माध्यमिक) महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक असून शैक्षणिक व सामाजिक विषयावर लेखन करतात)

# संविधानाच्या पानापानात माता रमाईच्या त्यागाचा गंध- बदनोरे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनात त्यागमूर्ती माता रमाईचे मोठे योगदान आहे. धीर गंभीरपणे रमाई या बाबासाहेब आंबेडकर यांच्या जगण्याचा आधार बनल्या. संविधानाच्या पानापानात रमाईच्या त्यागाच्या गंध येतो असे प्रतिपादनगांधीवादी विचारवंत, ज्येष्ठलेखिका माया बदनोरे यांनी केले.



करुणाशील समितीच्या वतीने माता रमाई जयंती निमित्ताने आयोजित महाथेरी सन्मान सोहळ्याप्रसंगी त्या बोलत होत्या अध्यक्षस्थानी सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव शिवाजी शिंदे हे होते.

मंचावर निवृत्त प्राचार्य डॉ. नसीमा पठाण, करुणाशील समितीचे प्रमुख आशुतोष नाटकर, ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत प्रा.एम. आर.कांबळे, प्रा. नरेश बदनोरे, मारुती कटकधोंड, पद्माकर कुलकर्णी आदी उपस्थित होते

अध्यक्ष अध्यक्ष मनोगतात रमाई आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने माता–भगिनींचा माता महाथेरी यांच्या नावाने सन्मान होत अभिमानास्पद गोष्ट असल्याचे मत डॉ. शिवाजी शिंदे यांनी व्यक्त केले. प्राचार्य नशिमा पठाण यांनीही या उपक्रमाचे कौतुक करून सत्कारमूर्तींच्या कार्याचा गौरव केला. प्रारंभीपाहुण्यांच्या हस्ते तथागत गौतम बुध्द, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माता रमाई यांच्या स्मृतींना पुष्प अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. सत्कारमूर्तींनी आपले मनोगत व्यक्त करुन कृतज्ञता व्यक्त केली. श्रीपाद येरमाळकर यांनी सूत्रसंचालन तर संयोजक आशुतोष नाटकर यांनी प्रास्ताविक व आभार मानले.

**यांचा झाला गौरव**

ज्येष्ठ समाजसेविका शेवंताबाई मोरे, इंदुमती कांबळे, माजी महापौर अलका राठोड, कालम्मा मंडेपू, प्रा.डॉ. आशा रोकडे–किर्तीकर, उपमुख्याध्यापिका डॉ. सुरैय्या सय्यद, ज्येष्ठ लेखिका संध्या धर्माधिकारी, ज्येष्ठ धम्म उपासिका धम्मरक्षिता कांबळे, मंगला बंगाळे, सुचित्रा थोरे, श्रीमती मनिषा माने

# सम्राट प्रतिष्ठान अकलूज यांच्या वतीने माता रमाई जयंती साजरी

**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** अकलूज येथील सम्राट प्रतिष्ठानच्या अध्यक्षा कोमलताई शशिकांत भोसले, यांच्या मार्गदर्शनाखाली त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांची 128 जयंती, महादेवनगर अकलूज येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



यावेळी माता रमाई यांच्या प्रतिमेस, उपस्थित महिला व अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी माता रमाई यांच्या जयंतीचे औचित्य साधून, सम्राट प्रतिष्ठानच्या वतीने, महादेवनगर अकलूज, अंगणवाडीतील लहान मुलांना, कोमलताई शशिकांत भोसले यांच्या हस्ते खेळणे देण्यात आली.यावेळी अंगणवाडी सेविका भाग्यश्री भागवत,मनीषा गायकवाड,पूजा वाघमारे,लता माने,संगीता कांबळे,तमन्ना पठाण,हिना नदाफ,मुमताज बागवान,आसावरी खंडागळे,शारदा जगताप,लक्ष्मी वाघमारे,वनिता शेंडगे इत्यादी उपस्थित होते.

यावेळी कोमलताई भोसले म्हणाल्या की माता रमाई यांचा जन्म ७ फेब्रुवारी १८९८ मध्ये, वनंद (रत्नागिरी जिल्हा) येथे झाला.त्यांचा विवाह भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी झाला होता. माता रमाई या साध्या, संयमी आणि कष्टाळू स्वभावाच्या होत्या. डॉ.बाबासाहेबांच्या शिक्षणासाठी व समाजकार्याच्या काळात त्यांनी खूप त्याग केला. त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना नेहमी साथ दिली.

माता रमाई यांचे आयुष्य, संघर्षमय होते, पण त्यांच्या त्यागामुळे आणि साथेमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मोठे कार्य करता आले. त्यामुळे समाजात त्यांना आदर्श पत्नी मानतात.

अकलूज येथील सम्राट प्रतिष्ठान हे नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर असताना दिसत आहे.सम्राट प्रतिष्ठानचे संस्थापक मार्गदर्शक शशिकांत भोसले हे नित्य नियमाने, सर्वच महापुरुषांची जयंती साजरी करतात तसेच त्यांच्या जयंतीचे औचित्य साधून, सामाजिक उपक्रम राबवत असतात. यामुळे त्यांचे अकलूज परिसरातून कौतुक होताना दिसत आहे.

# जय मल्हार क्रांती संघटनेच्या जिल्हा उपाध्यक्षपदी राहुल बोडरे

**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** जय मल्हार क्रांती संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने सामाजिक व संघटनात्मक कार्याची दखल घेत निमगाव – वेळापूर येथील आरबी उद्योग समूहाचे प्रमुख राहुल विजयकुमार बोडरे यांची सोलापूर जिल्हा युवक उपाध्यक्षपदी अधिकृत निवड करण्यात आली आहे.

ही निवड संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दौलतनाना शितोळे व महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अंकुश रामभाऊ जाधव यांच्या आदेशानुसार करण्यात आली आहे. नियुक्तीपत्र देऊन त्यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

राहुल बोडरे हे माळशिरस तालुक्यातील निमगांव (म.) – वेळापूर येथील रहिवासी असून आरबी उद्योग समूह व कैलासवासी विजयराव बोडरे सामाजिक संस्थेच्या माध्यमातून युवकांमध्ये सामाजिक संघटन, न्यायासाठीचा लढा व संघटन वाढीसाठी त्यांनी सातत्याने काम केले आहे. त्यांच्या अनुभवाचा व कार्यकर्तृत्वाचा फायदा संघटना वाढीसाठी निश्चितच होईल, असा विश्वास संघटनेने व्यक्त केला आहे.




या निवडीबद्दल विविध सामाजिक, राजकीय व युवक कार्यकर्त्यांकडून राहुल बोडरे यांचे अभिनंदन करण्यात येत असून त्यांनी देखील संघटनेचे आभार मानत ह्रमिळालेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडून जय मल्हार क्रांती संघटनेचे कार्य जिल्हाभर मजबूत करूह्र असे मत व्यक्त केले आहे. यावेळी सोलापूर जिल्हा अध्यक्ष मोहन घाडगे, युवा उद्योजक अजय बोडरे, गणेश बगाडे, प्रतीक चव्हाण, शुभम मोरे, राजाभाऊ खरात, अमोल वाघ, राजे भाकरे, महेश चव्हाण, अक्षय मदने, सुनील बोडरे, आनंदा बोडरे, अक्षय बोडरे, सुरज बोडरे, वैभव बोडरे, यश बोडरे, सागर साठे,लखन शेंडगे, मनोज भोसले, मुकुंद चव्हाण, किरण चव्हाण, माऊली मस्के, रोहित बोरकर, मंगेश जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या या निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होताना दिसत आहे.

# लागलेल्या आगीमुळे रूपाली मशीनरी दुकानाचे लाखो रूपयांचे नुकसान



**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** अकलूज येथील महावीर पथवरील रुपाली मशीनरी व पाईप्स या दुकानास पहाटे ४ वाजता शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत दुकानातील शेतीच्या साहित्य जळून खाक झाल्याने ८० लाख ९० हजारांचे नुकसान झाले. दुकानाशेजारीच्या आयडीएफसी बँकेचे फर्निचरचे व उपाध्ये यांची बुलेट व रिक्षा जळाली आहे या घटनेची खबर सोहन सुहास गांधी यांनी अकलूज पोलिस ठाण्यात दिली असून या घटनेची अकस्मात जळीत नोंद करण्यात आली आहे.

याबाबत सोहन गांधी यांनी अकलूज पोलिस ठाण्यात दिलेल्या खबरीनुसार गुरुवारी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास मोठा आवाज झाल्याने बाहेर येऊन पाहिले असता.त्यांच्या मशीनरीच्या दुकानाला आग लागल्याचे दिसून आले.त्यांनी कुटुंबासह खाली येण्याचा प्रयत्न केला पण आग खूप मोठी असल्याने घराच्या खिडकीच्या गज वाकवून आई, वडील,पत्नी,२ मुलांसह बाहेर आले.त्यावेळी अग्निशामक दलाच्या गाड्यांनी तातडीने आग विझवल्यामुळे पुढील अनर्थ टळला.

या आगीत दुकानातील शेतीचे इलेक्ट्रिक मोटरी (पंप) २२, सबमर्सिबल केबल ४ रोल,पिठाची चक्की व मिरची कांडप मशीन (२०),पीव्हीसी पाइप व फिटिंग साहित्य,इलेक्ट्रिक मोटर साहित्य, शेती खते,संसारोपयोगी वस्तू व फर्निचर,होंडा सिटी कार १ व दुचाकी २ असे साहित्य जळाले.

शॉर्ट सर्किटच्या आगीमुळे ८० लाख २० हजार रुपयांचे नुकसान झाले तर शेजारच्या आयडीएफसी फर्स्ट बँकेचे शटर,फर्निचर,एसी, सीसीटीव्ही सिस्टिम तसेच धन्यकुमार उपाध्ये यांची बुलेट गाडी व रिक्षा जळाले असल्याचे फियार्दीत म्हटले आहे.अधिक तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल रणवरे हे करत आहेत.

रूपाली मशिनरी या दुकानला अचानक लागलेल्या आग समजताच आग विझवण्यासाठी अकलूज नगरपरिषदेच्या पाण्याचा टँकर,स.म.शंकरराव मोहिते– पाटील कारखाना अग्निशामक दल शंकरनगर,पांडुरंग सहकारी साखर कारखाना आग्निशामक दल श्रीपूर,श्री शंकर सहकारी साखर कारखाना आग्निशामक दल सदाशिवनगर यांच्या अथंग प्रयत्नामुळे आगीवर नियंत्रण आले.त्यामुळे पुढील अनर्थ टळला.पण या आगीत वित्त हानी मोठी झाली आहे.

## वात्रटिका

**सौंदाळा गाव**

कोणी किती केले प्रयास
जाता जात नाही जाती...
अशा काळात सौंदाळा
देणार जातीला मुठमाती...
कौतुकापेक्षा सौंदाळाचे
अनुकरण व्हायला हवे...
ज्ञानेश्वराच्या नेवास्यावरून
सौंदळ्याला एकदा जावे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# महापालिका शाळांचा विकास फक्त सांगून नव्हे तर कृतीतून करून दाखवणार- चाकोते




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** माता रमाई जयंतीचे औचित्य साधून अपरिचित सामाजिक संस्थेच्या माध्यमातून माननीय नगरसेविका रंजीताताई चाकोते मॅडम यांच्या हस्ते मनपा मुलांची मराठी शाळा क्रमांक 29, भवानीपेठ, सोलापूर येथील इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी बसलेल्या विद्यार्थ्यांना अभ्यासाची पुस्तके वाटप करण्यात आली.या उपक्रमामुळे शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा आधार मिळाला असून त्यांच्या अभ्यासाला निश्चितच चालना मिळणार आहे. समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी राबविण्यात आलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले.

याप्रसंगी बोलताना माननीय नगरसेविका रंजीताताई चाकोते म्हणाल्या की, 'महापालिका शाळांचा सर्वांगीण विकास फक्त सांगून नव्हे तर प्रत्यक्ष कृतीतून करून दाखवणार आहे. शाळेतील विद्यार्थ्यांच्या अनेक गरजा असतात. त्या गरजा थेट विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. यासाठी मी नक्कीच प्रयत्न करेन. तसेच विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासाबरोबरच खेळालाही तितकेच महत्त्व द्यावे, जेणेकरून शरीर तंदुरुस्त राहील आणि सर्वांगीण विकास साधता येईल,' असे आश्वासन त्यांनी दिले.

यावेळी अपरिचित सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माननीय मयूरजी गवते यांनी संस्थेच्या कार्याविषयी माहिती दिली. यानंतर नगरसेविका रंजीताताई चाकोते यांनी अपरिचित सामाजिक संस्थेच्या कार्याचे कौतुक करताना, 'समाजातील प्रत्येक गरजूंपर्यंत पोहोचण्याचे महत्त्वपूर्ण कार्य अपरिचित सामाजिक संस्था करत असून हे कार्य अत्यंत प्रेरणादायी व महान आहे,' असे गौरवोद्गार काढले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल अपरिचित सामाजिक संस्थेचे तसेच शाळेतील शिक्षकवर्गाचे उपस्थितांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# श्री स्वामी समर्थांच्या आशीर्वादासह उपमहापौर पदाचा कार्यकाल जनसेवेसाठी समर्पित - उपमहापौर देवकर

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थांचे आशीर्वाद घेऊन जनतेची प्रामाणिकपणे आपण सेवा करू. श्री स्वामी समर्थांच्या आशीर्वादासह महापौर पदाचा कार्यकाल जनसेवेसाठी समर्पित असल्याचे मनोगत सोलापूर महापालिकेचे नुतन उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी व्यक्त केले. ते नुकतेच सोलापूर महापालिकेचे नुतन महापौर म्हणून निवडून आल्यानंतर सर्व प्रथम येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी उपमहापौर देवकर, व



सोलापूर महापालिकेचे उपमहापौर देवकर व सहकाऱ्यांचा देवस्थान कार्यालयात सत्कार करताना महेश इंगळे व अन्य दिसत आहेत.

भाजप मंडळ अध्यक्ष महेश देवकर,

पर्यावरण दूत डॉ.मनोज देवकर, जिल्हा विधी प्राधिकरणचे प्रतिभा देवकर, इको नेचर क्लबचे सदस्य अर्चना होळकर, संजय वाघमारे, बसवराज वनगुंडी

यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सत्कार केला.

यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर बोलत होत्या. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, दर्शन घाटगे, श्रीकांत मलवे, प्रसाद सोनार, समर्थ स्वामी, तुषार मोरे, धनराज स्वामी आदींसह भाविक भक्त उपस्थित होते.

# सोलापूर-तिरुपती थेट विमानसेवेचे संकेत; पुण्यात मिळेना स्लॉट

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुणे विमानतळावर स्लॉट उपलब्ध न झाल्यामुळे स्टार एअर कंपनीकडून प्रस्तावित पुणे- सोलापूर- तिरुपती विमानसेवा थेट सोलापूर विमानतळावरून सुरू करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. यासंदर्भात कंपनीकडून प्राथमिक चाचपणी करण्यात आली असून, सोलापूर- तिरुपती थेट विमानसेवा सुरू होण्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. सध्या सोलापूर विमानतळावरून मुंबई आणि गोवा या शहरांसाठी विमानसेवा सुरू आहे.

सोलापूर शहर व जिल्ह्यातून तिरुपतीसाठी जाणाऱ्या भाविकांची संख्या मोठी असून, तिरुपतीसाठी थेट विमानसेवेची मागणी अनेक वर्षांपासून होत आहे. तांत्रिक अडचणी व नाईट लँडिंगच्या मर्यादांमुळे ही सेवा आतापर्यंत लांबणीवर पडली होती. मात्र, या अडचणींवर उपाय शोधत स्टार एअरने सोलापूरहून तिरुपती सेवा सुरू करण्याचे नियोजन आखले आहे. कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना अंतिम मान्यता मिळाल्यानंतर पुढील आठवडाभरात तिकीट बुकिंग सुरू होण्याची शक्यता असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले. स्टार एअर कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नियोजनास दुजोरा दिला असून, बुकिंगची अधिकृत तारीख अद्याप जाहीर केलेली नाही. मात्र, सोलापूरकरांच्या मागणीनुसार शक्य तेवढ्या लवकर तिरुपती विमानसेवा सुरू केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

## नाईट लँडिंगची अडचण कायम

सोलापूर विमानतळावर दिवसा विमान उड्डाण व उतरण्यास कोणतीही अडचण नाही.

मात्र, रात्री ७ नंतर नाईट लँडिंगसाठी आवश्यक सुविधा नसल्याने इतर शहरांशी विमानसेवा जोडण्यात अडथळे येत आहेत. यासाठी विमानतळ प्रशासनाने नाईट लँडिंगसाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देण्याची मागणी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे. मात्र, याबाबत अद्याप कोणताही ठोस निर्णय झालेला नाही.

# इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून प्रस्ताव मागविण्याचे आवाहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** इतर मागास विकास विभागांतर्गत कार्यरत इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांच्या मार्फत शासन निर्णय व शुध्दीपत्रकान्वये विभागांतर्गत स्थापना करण्यात आलेल्या विविध पुरस्कारांसाठी पात्र व इच्छुक व्यक्ती तसेच समाजाच्या उत्थानासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक क्षेत्रातील उत्थानासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना खालील पुरस्कारांसाठी प्रस्ताव सादर करता येणार आहेत :

1. महात्मा बसवेश्वर सामाजिक समता शिवा पुरस्कार
2. नटराज पुरस्कार
3. विश्वकर्मा पुरस्कार
4. क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कार

**अटी व शर्ती :**

- अर्जदार व्यक्ती/संस्था महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असणे आवश्यक.
- समाजाच्या उत्थानासाठी सलग व उल्लेखनीय कार्य केलेले असावे.
- अर्ज विहित नमुन्यात सादर करणे बंधनकारक असून आवश्यक कागदपत्रे, कार्याचा सविस्तर अहवाल, शिफारस
- पत्रे व प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक.
- अपूर्ण अथवा मुदतीनंतर प्राप्त होणारे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.
- अंतिम निर्णय शासन स्तरावर घेण्यात येईल.

प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख 21 फेब्रुवारी 2026 असून, अर्ज सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, सात रस्ता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, चौथा मजला, सोलापूर येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत. अर्जाचा नमुना व अधिक माहिती संबंधित कार्यालयात उपलब्ध आहे.

पात्र व इच्छुक व्यक्ती व संस्थांनी विहित मुदतीत प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन सहायक संचालक इतर मागास बहुजन कल्याण विभाग, गणेश सोनटक्के यांनी केले आहे.

## जाहिर प्रसिध्दीकरण

अर्ज.नं. /२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

राजेंद्र महादेव सुतार,वय -५२ वर्षे. धंदा- मजुरी
रा.चिंचोलीकाटी ता.मोहोळ जि.सोलापूर } अर्जदार

विरूध्द

ग्रामपंचायत चिंचोलीकाटी, ता.मोहोळ, जि.सोलापूर }सामनेवाला

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांची मुले साक्षी राजेंद्र सुतार जन्म दि.६/१/२००६ व व्यंकटेश राजेंद्र सुतार जन्म दि. २४/२/२००९ रोजी चिंचोलीकाटी ता.मोहोळ जि.सोलापूर येथे झाला आहे.

अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार यांची बहिण म्हणजेच साक्षी राजेंद्र सुतार व व्यंकटेश राजेंद्र सुतार यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जानेवारी २००६, फेब्रुवारी २००९ चे आभिलेखात अर्जदार यांची यांची मुले यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२२/१/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे. ता. ६/१/२०२६

शिक्का — सही/- तहसिलदार,मोहोळ.

## जाहिर प्रसिध्दीकरण

अर्ज.नं. /२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

दिलावर खलील बागवान, वय-४८ वर्षे.धंदा-मजुरी
रा.येडशी जि. उस्मानाबाद } अर्जदार

विरूध्द

मोहोळ नगरपरिषद मोहोळ }सामनेवाला

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांची मुले अबुसाहील दिलावर बागवान जन्म.दि.६/१/२००३ व अल्फिया दिलावर बागवान जन्म दि.१४/२/२००५ व आलीया दिलावर बागवान यांचा जन्म दि.३०/११/२००६ रोजी मोहोळ ता.मोहोळ जि.सोलापूर येथे झाला आहे.

अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार अबुसाहील दिलावर बागवान, अल्फिय दिलावर बागवान, आलीया दिलावर बागवान यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची तारीख वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जानेवारी २००३, फेब्रुवारी २००५, नोहेंबर २००६ चे आभिलेखात अर्जदार यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२२/२/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे.ता.६/२/२०२६

शिक्का — सही/- तहसिलदार,मोहोळ.

# शिवजयंती उत्सव परवाने तात्काळ सुरू करण्याबाबत आयुक्तांना निवेदन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्सवातील मंडळांना परवाने तात्काळ द्यावेत अशी मागणी छत्रपती ब्रिगेडचे वतीने पोलीस आयुक्तांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

सोलापूर शहरात 14 ते 19 फेब्रुवारी या कालावधीत सोलापूर शहरात मोठ्या प्रमाणात शिवजन्मोत्सव साजरा करण्यात येतो विविध मंडळाच्या मोठ्या मिरवणुका निघतात त्यासाठी पोलीस प्रशासनाच्या परवानगीची आवश्यकता असते शिवजन्मोत्सव काही दिवसावर येऊन ठेपल्यामुळे पोलीस आयुक्तालय कार्यालयात शांतता कमिटीची व शिवजन्मोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक लवकरात लवकर आयोजित करून शिव जयंती उत्सव परवानगी प्रक्रिया तातडीने सुरू करण्यात यावी नवीन मंडळांना शिव जन्मोत्सव साजरे करण्यासाठी परवानगी देण्यात यावी आगामी येणाऱ्या सगळ्याच जयंती उत्सवाला डॉल्बी साठी परवानगी देण्यात येऊ नये. सोलापूर शहराचा डॉल्बीमुक्त संकल्पनाचा आदर्श राज्याने घेतलेला आहे तो आदर्श कायम ठेवावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी छत्रपती ब्रिगेडचे संस्थापक श्याम कदम जिल्हाध्यक्ष अरविंद शेळके शहराध्यक्ष सिताराम बाबर जिल्हा कार्याध्यक्ष मनीषा कोळी शहराध्यक्ष माधुरी चव्हाण शहर संघटक बसवराज आळंगे जिल्हा संपर्कप्रमुख इस्माईल मकानदार शहर उपाध्यक्ष रमेश चव्हाण आदी उपस्थित होते.

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

# मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज- सचिन इथापे

**पंढरपूर,(कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ०८ गटासाठी व त्याअंतर्गत पंचायत समितीच्या १६ गणासाठी शनिवार दि.०७ फेब्रुवारी रोजी ३०९ मतदान केंद्रावर मतदान पार पडले. या निवडणूकीत एक लाख ९८ हजार ४६७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मतमोजणी शासकीय धान्य गोदाम येथे सकाळी १०.०० वाजता सुरु होणार आहे. मोजणीसाठी प्रशासनाची तयारी पूर्ण झाली असून प्रशासन सज्ज असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली. पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ०८ गटासाठी व पंचायत समितीच्या १६ गणासाठी ६९.४४ टक्के इतके मतदान झाले असून, निवडणूकीत एक लाख ५ हजार ६५७ पुरुष तर ९२ हजार ८१० स्त्री अशा एकूण एक लाख ९८ हजार ४६७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. तसेच आतापर्यंत ६६३ टपाली मतदान झाले आहे. मतमोजणी १६ टेबल होणार असून दोन राखीव टेबल ठेवण्यात आले आहे. तर टपाली मतमोजणी गटासाठी एक टेबल व गणासाठी दोन अशा एकूण तीन टेबलवर होणार आहे. मतमोजणी प्रक्रीयेसाठी १२० अधिकारी कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



उमेदवारांचे मतमोजणी प्रतिनिधी, मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांना मतमोजणी केंद्रामध्ये मोबाईल घेवून जाण्यास मनाई करण्यात आली आहे. प्रवेशद्वारावर याबाबतची तपासणी करूनच मतमोजणी केंद्रामध्ये प्रवेश देण्यात येणार आहे. मतमोजणी केंद्र परिसरात प्रवेश करताना पोलिसांकडून प्रत्येक व्यक्तीची तपासणी केली जाणार असून अधिकृत पास असल्याशिवाय कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही.

मतमोजणी केंद्र परिसरात स्वतंत्र मिडिया सेंटर तयार करण्यात आले असून प्रसारमाध्यम प्रतिनिधींना याठिकाणी प्रवेश दिला जाणार आहे. प्रसार माध्यम प्रतिनिधींना सुध्दा केवळ मिडीया सेंटरमध्येच मोबाईलचा वापर करता येईल अशा सूचनाही निवडणूक निर्णय अधिकारी श्री. इथापे यांनी दिल्या.

प्रत्येक टेबलवरील मतमोजणी व्हिडीओ चित्रीकरण करण्यासाठी सी.सी. टिव्ही कॅमेऱ्यांची व्यवस्था करण्यात आली असून, मतमोजणी केंद्रात व्हिडीओ चित्रीकरण करणारे फिरते पथकेही कार्यरत राहणार आहेत. मतमोजणी प्रक्रिया शासकीय धान्य गोदाम, पंढरपूर येथे सोमवार दि. ०९ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.०० वाजता सुरू होणार आहे. मतमोजणी व्यवस्था, निकाल संकलनासाठी आवश्यक व्यवस्था, स्ट्रॉंगरुमवर देखरेख, संकलन आदीबाबतचे निवडणुक नियुक्त अधिकारी-कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले असल्याची माहिती सहा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

## जाहिर प्रसिध्दीकरण

अर्ज.नं. /२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

रेश्मा मौला मुजावर,वय-४१ वर्षे. धंदा- गृहिणी
रा.पंढरपूर जि.सोलापूर } अर्जदार

विरूध्द

मोहोळ नगरपरिषद मोहोळ }सामनेवाला

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार रेश्मा मौला मुजावर यांचा जन्म दि.१/६/१९८५ रोजी मोहोळ ता.मोहोळ.जि.सोलापूर येथे झाला आहे.

अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार रेश्मा मौला मुजावर यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची तारीख वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून १९८५ चे आभिलेखात अर्जदार यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२२/२/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे.ता. ६/२/२०२६

शिक्का — सही/- तहसिलदार,मोहोळ.

## जाहिर प्रसिध्दीकरण

अर्ज.नं. /२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

नाझीर महंमदहनिफ आतार,वय-४४ वर्षे.धंदा-मजुरी
रा.मोहोळ जि.सोलापूर } अर्जदार

विरूध्द

मोहोळ नगरपरिषद मोहोळ }सामनेवाला

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार नाझीर महंमदहनिफ आतार यांचा जन्म दि.१/६/१९८२ रोजी मोहोळ ता.मोहोळ.जि. सोलापूर येथे झाला आहे.

अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार नाझीर महंमदहनिफ आतार यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची तारीख वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळीं सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून १९८२ चे आभिलेखात अर्जदार यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२२/२/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे.ता. ६/२/२०२६

शिक्का — सही/- तहसिलदार,मोहोळ.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

# सोलापूर महापालिकेच्या वतीने माता रमाई आंबेडकर जयंतीनिमित्त अभिवादन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने सामाजिक समता, महिला सक्षमीकरण व त्यागाचे प्रतीक असलेल्या माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कौन्सिल हॉल येथील महापौर कार्यालयामध्ये आज नूतन महापौर मा. श्री. विनायक कोंड्याल यांच्या हस्ते माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.यावेळी उपमहापौर मा. सौ. ज्ञानेश्वरी देवकर, अतिरिक्त आयुक्त मा. सौ. वीणा पवार, नगरसेविका सौ. वनिता गायकवाड, नगरसेवक सत्यजीत वाघमोडे, महेश देवकर, पर्यावरण दूत डॉ. मनोज देवकर, भाजपा महिला सरचिटणीस सौ. श्वेता वनमाने, कामगार नेते बापू सदाफुले, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे, चंद्रकांत दोनतुलू, लिपिक गणेश कोळी, यलपा पुजारी, अशोक खडके यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी माता रमाई आंबेडकर यांच्या सामाजिक कायार्चा व त्यांच्या जीवनातील त्याग, संघर्ष व समतेच्या मूल्यांचा गौरव केला. माता रमाई आंबेडकर यांनी समाजातील दुर्बल घटकांच्या उत्थानासाठी दिलेले योगदान सदैव प्रेरणादायी असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

**पाहिजेत**


चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता
**सिक्युरिटी गार्ड**
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ – 11:30 ते 2 वा.

**CHANGE IN NAME**

I am changing my name from **Mahalingappa Shankarrao Dulange** TO Mahalingappa Shankar Dulange for passport issuance.

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) गरजू व्यक्तीस मानपान न पाहता कोणाचीही मदत घेणे उचित असते या अर्थाची म्हण २) टेकडी (हिंदीत) ३) डक उलट लिहा ४) एक आडनाव ५) बाण, तीर ६) एक म्हण-उथळ पाण्याला ***** फार ७) तांदूळ, भात (इंग्रजीत) ९) आजच्या पूर्वीचा गेलेला दिवस ११) परदेस चित्रपटाती अभिनेत्री-*** चौधरी १३) हेराफेरी चित्रपटातील अभिनेता-*** रावल १४) पतीचा भाऊ १६) नाट्य, ड्रामा (मराठीत) १७) शर्ट (ग्रामीण भाषेत) १९) गायीला दिला जाणारा नियमित खुराक २०) नट उलट लिहा २३) बॉडीगार्ड चित्रपटातील अभिनेत्री २६) स्वराज्याची पहिली राजधानी असलेला गड २७) ठाणे लगतचा जिल्हा २९) वांग्यामध्ये मसाला भरून केलेले ३२) वास, गंध ३६) फळातील गोड द्रव ३८) सोळा गुणिले दोन ३९) एक म्हण-दाम करी ** ४१) मार्ग, वाट (हिंदीत) ४२) तीन दुणे ४३) एक (इंग्रजीत) ४४) बारा गुणिले पाच

**आडवे शब्द :** १) भारताचे केंद्रीय नेते-नितीन **** ४) लातूरचे आमदार-अमित **** ७) कोकणातील एक आमदार-नितेश ** ८) पुष्कळ, भरमसाठ ९) बांगड्या विक्रीचा व्यवसाय करणारा १०) तरचा जोडीदार ११) दुधावरील साय १२) स्वभावाने खाष्ट १३) छ. शिवराय या गडावर असताना सिध्दी जोहरने गडाला वेढा टाकला होता १५) कोंढाणा किल्ला घेणारा छ. शिवरायांचा शूर सरदार १८) कापड फाटताना होणारा आवाज २१) पाण्याची लहर २२) दहा वर्षांचा काळ २४) नऊ भागिले तीन २५) पाच आणि सहा मिळून होणारी संख्या २७) तापमान पाहण्यासाठी वापरतात तो धातूचा पातळ चकचकीत घटक २८) घोड्यावर बसल्यानंतर पाय ठेवण्यासाठी असलेली लोखंडी कडी ३०) मवाळच्या विरूध्दार्थी ३१) नाम उलट लिहा ३२) कथेतील पंख असलेली स्त्री ३३) गरम मसाल्यातील एक घटक ३४) घड्याळ (हिंदीत) ३५) नवे कोरे, नवीन कोऱ्या न वापरलेल्या नोटा या अर्थाने ३७) घराच्या पायाभरणीसाठी वापरतात ते दगड, मुरूम इ. मटेरियल ३९) याच्यापासून धागा बनतो ४०) रास उलट लिहा ४२) उन्हाळा (इंग्रजीत) ४३) एक म्हण-काखेत कळसा अन् गावाला *** ४५) अकरा गुणिले तीन ४६) मुलाची पत्नी, स्नुषा

## सुडोकु - 171

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 7 | | | 4 | 2 | 9 | 1 | 5 |
| 1 | 3 | | 5 | | 8 | | 2 | |
| 5 | | 2 | | | | | 8 | 3 |
| 4 | | 3 | | | | 8 | 7 | |
| | 6 | 7 | | | 1 | 3 | | |
| | | | | | | 2 | 5 | |
| | | 4 | 6 | | 5 | | 3 | |
| 6 | | 1 | | | 4 | 5 | | 8 |
| | 8 | | 2 | | | | | 4 |

# इलेक्ट्रो प्रदर्शन १२ ते १८ फेब्रुवारी होम मैदानावर - भव्य स्वरुपात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर इलेक्ट्रॉनिक्स डिलर्स असोसिएशन द्वारा इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्पुटर , टेलिकम्युनिकेशन, होम अप्लायन्सेस, सोलार सिस्टम, फिटनेस इक्विपमेंटस् चे भव्य प्रदर्शन 'इलेक्ट्रो २०२६' चे आयोजन केले गेले आहे. दि. १२ ते १८ फेब्रुवारी या कालावधीत होम मैदानावर हे प्रदर्शन आयोजित केले असल्याची माहिती सेडाचे अध्यक्ष डॉ. सुरजरतन धूत यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यंदा इलेक्ट्रो प्रदर्शनाचे व्ही प्लस हे मुख्य प्रायोजक तर विझेडवाय टीव्ही, लक्ष्मी ऑटोमोबाइल्स, अपार केबल्स, हाईफा इलेक्ट्रिकल्स्, हे सह प्रायोजक असून एमआयटी विश्वप्रयाग युनिव्हर्सिटी हे शैक्षणिक सहपप्रायोजक व सेटिसफाईड मीडिया प्रा. ली. हे सहप्रोजक आहेत. प्रदर्शनाचे उद्घाटन गुरुवार दि. १२ फेब्रुवारी रोजी सायं. ५ वा. व्हिप्लस कंपनीचे सीइओ संदीप पाटील यांच्या शुभहस्ते होणार असल्याची माहिती माजी अध्यक्ष ईश्वर मालू यांनी सांगितले.

७ दिवस चालणा ऱ्या इलेक्ट्रो २०२६ या प्रदर्शनाचे हे २६ वे वर्ष असून सोलापूर शहर जिल्हा व महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रा, तेलंगाणा व इतर आजूबाजूंच्या शहरातील सर्व ग्राहक या प्रदर्शनाची वाट पाहत असतात. दररोज दु. ४ ते रा. ९.३० व रविवारी स.११ ते रा.९. ३० पर्यंत चालणाऱ्या या प्रदर्शनामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा सहभाग असून एलईडी, फ्रिज , साईड बाय साईड फ्रिज, एअर कंडीशनर, म्युझिक सिस्टीम, वॉशिंग मशीन, डिश टिव्ही, मायक्रोवेव ओव्हन, व्हॅक्यूम क्लिनर, एअर कंडीशनर, कॉम्प्युटर, लॅपटॉप प्रिंटर्स, नेटवर्किंग- वायफाय प्रॉडक्ट्स , बिझनेस सॉफ्टवेअर, सोलार सिस्टीम, गॅस गिझर, मोबाईल, आय पॅड, टेलीफोन, मिक्सर, फूड प्रोसेसर, आटा चक्की, एअर कुलर, वॉटर प्युरीयर, स्टॅबीलायझर, चिमणी हुड, फिटनेस इक्विपमेंटस् इत्यादी या प्रदर्शनामध्ये उपलब्ध असतात. ग्राहकांना विविध नमुन्यात व विविध रंगात आकर्षक किंमतीत निरनिराळ्या योजनांखाली वस्तू खरेदी करता येतात. तसेच फायनान्स कंपनीच्या माध्यमातून शुन्य टक्के व्याज दराने कजार्ची उपलब्धता देखील केली जाते.

सेडा तर्फे आयोजित केलेल्या इलेक्ट्रो २०२५ ला स्टॉल धारकांनी प्रचंड प्रतिसाद दिला होता . यावर्षी सुमारे ३६० स्टॉल्स असणार असून सुमारे एक लाख पेक्षा जास्त ग्राहक प्रदर्शनास भेट देतील. प्रदर्शनाचे यंदाचे खास आकर्षण म्हणजे एआय वर आधारीत टीव्ही ची नवीन 100 ते 120 इंचची श्रेणी, सोलार चार्जर स्टेशन, डिजिटल होम अप्लायन्सेस, बारकोड स्कॅन केल्यावर घरबसल्या संपूर्ण माहिती, सह ५ वेगळे डोम्स (जर्मन हँगर) मध्ये प्री फॅब्रीकेटेड व कंपनी फिटेड स्टॉल्स असणार आहेत.

या प्रदर्शनामध्ये ठिकठिकाणी ग्राहकांना बसण्याची सोय , मोफत पार्किंग तसेच शुध्द पिण्याचे पाण्याची सोय केलेली आहे. भेट देणाऱ्या ग्राहकांना दररोज लकी व शेवटच्या दिवशी बंपर ड्रॉ काढण्यात येणार आहे.

सर्व स्टॉल मध्ये जवळपास 450 विविध कॉलेजमधील पदवीधर व एमबीए विद्यार्थ्यांना सेडा मार्फत ट्रेनिंग देवून ग्राहक सेल्स माहिती देण्यात येणार आहे .या प्रदर्शनाच्या संपूर्ण संयोजनसाठी सेडाद्वारे विविध समित्या कार्यरत आहे. यंदाचे प्रदर्शन हे वैविध्यपूर्ण, नाविन्यपूर्ण आणि सुविधापूर्ण असणार आहे. धुळमुक्त प्रदर्शनासाठी संपूर्ण मैदान वर मॅटींग ची व्यवस्था करण्यात आली आहे. स्टॉलधारक आणि प्रेक्षकांसाठी विविध सोयी उपलब्ध करण्यात येणार असुन यामध्ये खवय्या साठी फूड कोर्ट

इ. सोयी असणार आहेत. दिव्यांग व्यक्तिंना देखील प्रदर्शन अनुभवता येणार असुन त्यांच्यासाठी व्हील चेअरची विशेष सोय करण्यात आली आहे. प्रेक्षक आणि स्टॉल धारक यांच्या सुरक्षिततेसाठी फायर ब्रिगेड तसेच सिक्युरिटी गार्डस ही नेमण्यात आले आहेत. प्रदर्शन दरम्यान दररोज रक्तदान उपक्रम घेतला जाणार आहे. संपूर्ण प्रदर्शन जास्तीत जास्त कसे डिजीटल होईल यावर संपूर्ण कटाक्ष आहे. प्रदर्शनासाठी प्रशस्त मोफत पार्कीगची सोय व माहितीसाठी वेगळे काऊंटर व सहभागी स्टॉलची माहिती क्युआर कोड द्वारे सर्वांना त्यांच्या मोबाइलवरच मिळण्याची सोय यंदा करण्यात आली आहे अशी माहिती माजी अध्यक्ष ईश्वर मालू यांनी दिली.

सेडा तर्फे अनेक सामाजिक उपक्रम ही राबविण्यात येत असून त्यामध्ये सेडाच्या सभासदांच्या कर्मचाऱ्यांसाठी शैक्षणिक व वैद्यकिय मदतही करण्यात येते. कर्मचारी प्रशिक्षणासह व्यवसाय वृध्दीसाठी कार्यशाळेचेही आयोजन करण्यात येतात. या प्रदर्शनातही दोन स्टॉल्स सामाजिक संस्थांना उपलब्ध करुन दिले असून इच्छुक सामाजिक संस्थांनी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

या पत्रकार परीषदेस सेडाचे उपाध्यक्ष भुषण भुतडा, सचिव हरीश कुकरेजा, खजिनदार सुयोग कालाणी, सह सचिव गिरीश मुंदडा, संचालक सर्वश्री चंद्रकांत शाहपुरे, बसवराज नवले, विजय टेके व संस्थेचे माजी अध्यक्ष आनंद येमूल, ईश्वर मालू ,शिवप्रकाश चव्हाण, खुशाल देढिया, केतन शाह व इतर इलेक्ट्रो कमिटी सदस्य आदी उपस्थित होते.

## आयुक्त ओंबासे यांची क्रीडाई प्रदर्शनात समर्थ प्रसाद प्रकल्पाला भेट



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त सचिन ओंबासे यांनी क्रीडायच्या प्रदर्शनात समर्थ प्रसाद प्रकल्पाचे कौतुक करून त्यांनी बेल वाजून प्रकल्पाचे खूप मोठ्या प्रमाणात कौतुक केलं की अत्याधुनिक पद्धतीच्या इंजिनिअरिंगने नटलेल्या या प्रकल्पाचे त्यांनी मनापासून कौतुक केले. माजी कलेक्टर व मुख्यमंत्र्यांचे प्रमुख सल्लागार प्रवीण सिंह परदेशी यांनी समर्थ प्रसाद प्रकल्पाचे तोंड भरून कौतुक केले आणि मार्गदर्शनही केले की असा प्रोजेक्ट सोलापुरात येणे म्हणजे सोलापूरला अभिमानास्पद आहे कारण देशभरातील नावाजलेल्या इंजिनिअरिंगच्या माध्यमातून समर्थ प्रसाद प्रकल्पाचे प्रोजेक्ट तयार होणार आहे त्यामुळे सोलापूर साठी हे अभिमानास्पद असून या प्रकल्पात फ्लॅट असणे म्हणजे नागरिकांसाठी गौरवास्पद असल्याचे स्पष्ट केले.

धन्यवाद सोलापूरकर आणि क्रीडाई तसेच सोमा पाचे आयुक्त सचिन ओंबासे तसेच माजी जिल्हाधिकारी आणि मुख्यमंत्री कार्यालयातील मुख्य सचिव प्रवीण सिंह परदेशी सर यांचे मनापासून आभार त्यांनी वेळ काढून आमच्या स्टॉलला भेट दिली आणि आमच्या प्रकल्पाचे कौतुक केला आम्हाला प्रोत्साहन दिला त्यामुळे आम्ही त्यांचे मनापासून आभार मानतो.

## अकलुजच्या रमामाता महिला मंडळाच्या वतीने विविध उपक्रमाद्वारे त्यागमुर्ती रमाई जयंती साजरी



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** येथील रमामाता महिला मंडळ,रमामाता चौक यांच्या वतीने त्यागमुर्ती माता रमाई यांच्या 128 व्या जयंती निमित्त तीन दिवसाच्या रमाई मोहत्सवाचे आयोजन करुन विविध कार्यक्रमाच्या माध्यमातुन अभिवादन करण्यात आले.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी त्यागमुर्ती रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अकलूज येथील रमामाता महिला मंडळाच्या वतीने " रमाई मोहत्सव वर्ष 2 रे "आयोजित करण्यात आले होते.यामध्ये आठ दिवस रमाई यांच्या चारित्र्य ग्रंथाचे वाचन करण्या आले तर महीलांनच्या संगीत खुर्ची, प्रश्न मंजुषा,रांगोळी स्पर्धा व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. दि.6 फेब्रुवारी रोजी लहान मुलींच्या डान्स स्पर्धा पार पडल्या,तदनंतर महीलांनी रात्री 12 वा.पाळणा बांधुन रमाई जन्म उत्सव साजरा केला.

शनिवार दि.7 फेब्रुवारी रोजी सकाळी महामानवाच्या व माता रमाईच्या प्रतिमांचे पुजन करुन वंदना सुत्तपठण घेण्यात आले. सायंकाळी रमामाता महिला मंडळ व आंबेडकरनगर मित्र मंडळ यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाईच्या प्रतिमेची अकलूज शहरातुन भव्य मिरवणुक काढण्यात आली होती यावेळी अकलूज व परीसरातील आंबेडकर अनुयायी सहभागी झाले होते.

## सोलापूर-तुळजापूर-धाराशिव रेल्वेमार्गासाठी राज्य वाट्यातील १५० कोटी मंजूर



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नव्याने साकारल्या जात असलेल्या सोलापूर-तुळजापूर-धाराशिवरेल्वेमार्गासाठी राज्य शासनाने त्यांच्या वाट्यापैकी १५० कोटी रुपये वितरीत करण्यास मंजुरी दिली आहे. ६ फेब्रुवारी रोजी याबाबतचा शासन आदेशही निर्गमित करण्यात आला आहे.

तुळजापूर तीर्थक्षेत्र रेल्वेने जोडण्याची मागणी मागील अनेक वर्षांपासून होत होती.

दरम्यानच्या काळात सर्वेक्षणही पूर्ण झाले. मात्र, उत्पन्नाच्या दृष्टीने नॉट फिजिबल असा शेरा मारून रेल्वेने हा मार्ग अडगळीत टाकला होता. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत हा विषय पुन्हा ऐरणीवर आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यावेळी हा मार्ग पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार २०१९ साली हा मार्ग पिंकबुकमध्ये आला. या मार्गाची त्यावेळची प्रकल्प किंमत ही ९०४ कोटी ९२ लाख रुपये इतकी होती. तत्कालीन महायुतीच्या राज्य सरकारने या प्रकल्पाचा ५० टक्के खर्च उचलण्यास संमती दर्शवली होती. त्यानुसार ४५२ कोटी ४६ लाख रुपयांचे दायित्व राज्य सरकारने स्वीकारले.

दरम्यान, आता या प्रकल्पाची किंमत वाढून तब्बल ३२९५ कोटी रुपये इतकी झाली आहे. रेल्वे मंत्रालयाने या सुधारित प्रकल्प किमतीस मान्यता देण्यासाठी राज्य सरकारकडे प्रस्ताव दिल्यानंतर राज्याने गतवर्षीच त्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार आता राज्य सरकारचे दायित्व १६४७ कोटींवर जाऊन पोहोचले आहे. यापैकी ४० कोटी रुपये यापूर्वीच वितरीत करण्यात आले आहेत. दरम्यान, काम गतीने पुढे सरकत असल्याने रेल्वेने १५० कोटी रुपयांची मागणी केली होती. त्यास शुक्रवारी मंजुरी देण्यात आली असून, लवकरच हा निधी वितरीत केला जाणार आहे.

केंद्र व राज्य सरकारच्या भागीदारीतून हा प्रकल्प साकारला जात आहे. तो गतीने पूर्ण होण्यासाठी महायुती सरकारकडे आपला सातत्याने पाठपुरावा सुरू होता. त्यानुसार आज १५० कोटी रुपये वितरीत करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. रेल्वेमार्गाच्या कामाला आणखी गती मिळून लवकरच तीर्थक्षेत्र तुळजापूर रेल्वेच्या नकाशावर येऊ शकेल.

-राणा जगजितसिंह पाटील, आमदार, तुळजापूर.

## प्रचार बंदी कालावधीत वडगाव बूथ परिसरात भाजपकडून पोस्टरबाजी



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी प्रचार कालावधी अधिकृतरित्या संपल्यानंतरही वडगाव गाव व मतदान बूथ परिसरात भाजप उमेदवारांकडून प्रचारात्मक पोस्टर चिकटविण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) यांच्या वतीने धोत्री गण क्रमांक ११६ च्या उमेदवार कॉ. अश्विनी शामसुंदर आडम यांनी आचारसंहिता कक्षाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

कॉ. अश्विनी आडम यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, सायलेंट पिरियड लागू असताना वडगाव गावातील मतदान केंद्र क्रमांक ७६ व ७७ च्या परिसरात भाजप पक्षाच्या उमेदवारांकडून पोस्टर लावण्यात आली. या पोस्टरद्वारे मतदारांवर अप्रत्यक्ष प्रभाव टाकण्याचा प्रयत्न होत असून, हा प्रकार आदर्श आचारसंहिता तसेच निवडणूक आयोगाच्या स्पष्ट निर्देशांचा गंभीर भंग करणारा असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकाराबाबत कॉ. आडम यांनी तात्काळ मतदान केंद्र अध्यक्ष श्री. राठोड व जिनिल बादशहा नदाफ यांच्या समक्ष हरकत नोंदवली असल्याचेही तक्रारीत स्पष्ट केले आहे. प्रचार बंदी कालावधीत कोणत्याही स्वरूपाचे प्रचार साहित्य प्रसिद्ध करणे किंवा प्रदर्शन करणे हे कायद्याने निषिद्ध असून, अशा प्रकारांमुळे मुक्त, निर्भय व निष्पक्ष निवडणूक प्रक्रियेवर गंभीर परिणाम होत असल्याचा आरोप माकपकडून करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर सदर प्रकरणाची तात्काळ चौकशी करून बेकायदेशीर पोस्टर काढून टाकावीत, तसेच दोषी उमेदवार व संबंधित व्यक्तींवर लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ आणि आदर्श आचारसंहिता अंतर्गत कठोर कारवाई करावी, अशी मागणी कॉ. अश्विनी आडम यांनी निवडणूक प्रशासनाकडे केली आहे.

## 'स्व. महेश अण्णा कोठे यांचे वीरशैव लिंगायत भवनाचे स्वप्न पूर्ण करणार': महापौर विनायक कोंड्याल




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वीरशैव लिंगायत प्रतिष्ठान कडून 14 डिसेंबर 2025 रोजी घेण्यात आलेल्या अकराव्या वधू- वर परिचय मेळाव्याचे वधू- वर परिचय पुस्तकाचे प्रकाशन सोहळा रविवार 8 फेब्रुवारी 2026 रोजी श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटी कार्यालय सिद्धेश्वर मंदिर येथे मोठ्या थाटामाटात संपन्न झाले यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूरचे नूतन महापौर विनायक जी कोंड्याल यांच्या हस्ते व श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटी उपाध्यक्ष सिद्धेश्वर बमनी व सेक्रेटरी नीलकंठ कोनापुरे व विश्वस्त विश्वनाथ लब्बा, बाळासाहेब भोगडे, प्रभुराज मैंदर्गी, रतन रिक्के ,प्रकाश बिराजदार तसेच मान्यवर नगरसेवक राजशेखर पाटील, सुधीरजी खरटमल ,सिद्धेश्वर बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभीरे, सुदीपदादा चाकोते, डॉ प्रकाश घटूळे, दीपक आर्वे, सुरेश शहापूरकर , एम के पाटील, चनवीर चिटटे, अक्षय अंजीखाणे, सागर अतनुरे, गिरीश ताबे , राजशेखर नागशेट्टी , केदार बिराजदार, बाबासाहेब देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले या प्रकाशन सोहळ्यास श्री श्री श्री १००८ डॉ चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी जगद्गुरु काशी पीठ जंगमवाडी यांनी शुभाशीर्वाद दिले व वीरशैव लिंगायत प्रतिष्ठान कडून घडत असलेल्या सामाजिक कायार्चे कौतुक केले पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या यावेळी प्रथमता सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटी यांच्याकडून नूतन महापौर विनायक जी कोंड्याल यांचे महापौर पदी निवड झाल्याबद्दल शाल हार व ग्रामदैवत सिद्धरामेश्वर यांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. वीरशैव लिंगायत प्रतिष्ठान यांच्याकडूनही नूतन महापौर श्री विनायक जी कोंड्याल यांचा सत्कार शाल व हार घालून करण्यात आला.

तसेच सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटी कडून वीरशैव प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजशेखर विजापूरे यांचाही सत्कार शाल हार व सिद्धरामेश्वराची प्रतिमा देऊन करण्यात आला.

यावेळी बोलताना नतून महापौर यांनी स्व महेश अण्णा कोठे यांचे वीरशैव सांस्कृतिक कन्नड भवनचे स्वप्न पूर्ण करणार असे सांगितले तसेच या कार्यक्रमास प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजशेखर विजापूरे, सुनील शरणार्थी, आप्पासाहेब मनगुळी, तम्मा कडगंची, मल्लेश पुरवंत, राचप्पा अरळीमार, कैलास जेऊरे, शिवानंद बळोळी, श्रीशैल बिराजदार, मनोज कोले,अमित काबणे ,सुनील रामशेट्टी, उमाकांत धनशेट्टी, यांच्या उपस्थितीत पार पडला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गुरुनाथ निंबाळे तर आभार शशिकांत बिराजदार यांनी मानले

## जयंती उत्सव काळात डॉल्बी व प्रखर प्लाझमा-बीम लाईट वापरावर बंदी

### सोलापूर पोलीस आयुक्तांचे आदेश



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** माता रमाई जयंती (दि. 07 फेब्रुवारी) व छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव (दि. 15 ते 19 फेब्रुवारी) निमित्त सोलापूर शहरात विविध मिरवणुकींचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सव कालावधीत (दि. 07 ते 20 फेब्रुवारी 2026) मिरवणुकांमध्ये डॉल्बी सिस्टीमचा मोठ्या प्रमाणात वापर होण्याची शक्यता लक्षात घेता, नागरिकांच्या आरोग्यास व सुरक्षिततेस धोका निर्माण होऊ नये म्हणून डॉल्बी सिस्टीमचा वापर प्रतिबंधित करण्यात आला आहे.

गतकाळात डॉल्बी सिस्टीममुळे काही नागरिकांना कान, छातीचे त्रास होऊन अपंगत्व अथवा जीवितास धोका निर्माण झाल्याची प्रकरणे निदर्शनास आली होती. याबाबत जेष्ठ नागरिक व सामाजिक संघटनांनी निवेदने सादर करून डॉल्बी सिस्टीममुळे होणाऱ्या दुष्परिणामांबाबत चिंता व्यक्त केली होती. त्यानुसार भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, 2023 चे कलम 163(1) प्रमाणे हा आदेश पोलीस आयुक्त, शहर एम. राजकुमार यांनी दिला आहे. तसेच मिरवणुकीदरम्यान प्लाझमा बीम लाईट, लेझर लाईट यांचा प्रखर प्रकाश वाहन चालकांच्या डोळ्यांना दिपवून अपघात घडू शकतो, तसेच नागरिकांच्या डोळ्यांना कायमस्वरूपी इजा होण्याची शक्यता असल्याने या प्रकाशयंत्रणांवरही बंदी घालण्यात आली आहे. सोलापूर शहरात या उत्सव काळात सुमारे 219 सार्वजनिक मंडळे स्थापन होत असून त्यापैकी 32 मंडळे मिरवणुकीत सहभागी होतात. मंडळांनी साऊंड सिस्टीमसोबत प्लाझमा व लेझर लाईटचा वापर टाळावा, असे आदेश देण्यात आले आहेत. या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तीवर भारतीय न्याय संहिता, 2023 चे कलम 223 नुसार कारवाई करण्यात येईल, असेही पोलीस आयुक्तांनी स्पष्ट केले आहे.

## श्री स्वामी समर्थ आणि श्री क्षेत्र हे लतादीदी मंगेशकर यांचा श्रध्देचा विषय होता- भोसले



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ आणि श्री क्षेत्र हे भारतरत्न, गानसम्राज्ञी लतादीदी मंगेशकर यांचा श्रध्देचा विषय होता, स्वामीनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा, सुरनिष्ठा या त्रिवेणी संगम त्यांच्या ठाई होता अशी आदरांजली श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांनी वाहताना व्यक्त केले. ते पुणे येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह कोथरूड येथे भारतरत्न, गानसम्राज्ञी लतादीदी मंगेशकर स्मृती समारोह कार्यक्रमाप्रसंगी जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले हे बोलत होते. दरम्यान जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांनी भारतरत्न, गानसम्राज्ञी लतादीदी मंगेशकर यांना पुष्पांजली वाहून अभिवादन केले.

या प्रसंगी भावगंधर्व पंडित हृदयनाथ मंगेशकर, निरुपणकार विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर, डॉ. प्रो. एस. राजशेकरन, अध्यक्ष गंगा रुग्णालय कोइंबतूर, विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ कराड, अध्यक्ष एम.आय.टी., पं. सुरेश तळवळकर, आदिनाथ मंगेशकर, डॉ. धनंजय केळकर, डॉ. समीर जोग, सुश्री सोनाली कुलकर्णी, निवेदिका दिप्ती भागवत, गायिका सुश्री विभावरी जोशी, ऋतुजा तारे, प्राची देवल, मनीषा निश्चल, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सायबण्णा जाधव, श्री सुभेदार आदिजन बहुसंख्येने उपस्थित होते.

**अन्नछत्र मंडळाची संकल्पना लतादीदींना भावली**

श्री स्वामी आणि अक्कलकोट हे त्यांच्या विशेष श्रद्धेचे विषय होते. त्याच माध्यमातून त्यांच्याशी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांचे सूर जुळले. भारतरत्न, गानसम्राज्ञी लतादीदी मंगेशकर यांना एक स्वामी सेवक म्हणून अक्कलकोट मध्ये येणाऱ्या प्रत्येक भुकेलेल्या व्यक्तीला अन्न आणि भाविकाला छत्र देण्याची अन्नछत्र मंडळाची संकल्पना त्यांना खूप भावली आणि त्यातून त्यांनी स्वामी चरणी आपल्या वैभवातील काही मोती दान केले.

## महापौर विनायक कोंड्याल यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानास भेट



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेचे नूतन महापौर विनायक कोंड्याल यांनी आपल्या महापौर पदाच्या पहिल्या दिवसाच्या कामाची सुरुवात आज त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर उद्यान येथे भेट देऊन केली. यावेळी उद्यान परिसरात सुरू असलेल्या विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

महापौरांनी यावेळी उद्यानात उपस्थित असलेल्या मॉर्निंग ग्रुपच्या नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या, सूचना व अपेक्षा जाणून घेतल्या. नागरिकांच्या सोयीसुविधांच्या दृष्टीने सुरू असलेल्या विकासकामांचा दर्जा व गती याबाबत संबंधितांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.याचप्रसंगी त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. माता रमाई आंबेडकर यांच्या सामाजिक कार्याचा व त्यागाचा आदर्श पुढील पिढीस प्रेरणादायी असल्याचे महापौरांनी यावेळी नमूद केले. यावेळी उपमहापौर सौ. ज्ञानेश्वरी देवकर, नगरसेविका सौ. वंदना गायकवाड, नगरसेवक सत्यजित वाघमोडे, अजित गायकवाड तसेच कामगार नेते जानराव आदी मान्यवर उपस्थित होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे मॉर्निंग ग्रुपच्या वतीने आज माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी माता रमाई आंबेडकर यांच्या सामाजिक योगदानास अभिवादन केले.यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान परिसरात माता रमाई आंबेडकर यांचा पुतळा बसविण्याचे काम सुरू असून, सदर कामाची महापौरांनी पाहणी केली. पुतळा परिसराची स्वच्छता, सुशोभीकरण तसेच कामाचा दर्जा याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

तसेच उद्यानात नागरिकांसाठी सार्वजनिक स्वच्छालयाची आवश्यकता असल्याने त्या ठिकाणचीही पाहणी करण्यात आली. नागरिकांच्या सोयीसुविधांच्या दृष्टीने लवकरात लवकर स्वच्छालय उभारणीबाबत योग्य कार्यवाही करण्याचे निर्देश महापौरांनी दिले.यावेळी बोलताना महापौर विनायक कोंड्याल यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान हे सामाजिक व सांस्कृतिक दृष्टिकोनातून महत्त्वाचे ठिकाण असून येथे येणाऱ्या नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे. माता रमाई आंबेडकर यांच्या पुतळ्यामुळे या उद्यानाचे सामाजिक महत्त्व अधिक वाढेल, असेही त्यांनी नमूद केले.

## अणासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ पोर्टलवर Business Promotion सुविधेची सुरवात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अणासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळा यांच्या सर्व लाभार्थ्यांसाठी ही एक महत्वाची माहिती असून महामंडळाच्या अधिकृत www.udyog.mahaswayam.gov.in या पार्टलवर Business Promotiom(व्यवसाय वृध्दी) हा स्वतंत्र टॅब उपलब्ध करून देण्यात आला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून महामंडळाचे लाभार्थी आपली सेवा उत्पादने त्यांची किंमत तसेच वैशिष्ट्य या सह व्यवसायाशी संबंधीत सविस्तर माहिती पोर्टलवर अपलोड करू शकणार आहेत. या अंतर्गत लाभार्थ्यांना व्यवसायाचे नांव, व्यवसायाचा प्रकार, उत्पादने अथवा सेवा किंमती, वैशिष्टये, संपर्क तपशील व इतर आवश्यक माहिती पार्टलवर नोंदविता येणार आहे. या सुविधेमुळे लाभार्थ्यांच्या व्यवसायाला व्यापक प्रचार व प्रसिध्दी मिळणार असून त्यांची उत्पादने व सेवा थेट ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यास मदत होणार आहे.

या उपक्रमामुळे लाभार्थ्यांच्या व्यसायाचा विस्तार होण्यास चालना मिळेल. स्थानिक उत्पादने व सेवा ग्राहकांना सहज उपलब्ध होतील तसेच महामंडळाच्या लाभार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम होण्यास मदत होईल. तरी महामंडळाच्या सर्व संबंधित लाभार्थ्यांनी या सुविधेचा लाभ घेऊन आपली आवश्यक माहिती तात्काळ पोर्टलवर आपलोड करावी. याबाबत कोणतीही आडचण अथवा मार्गदर्शनासाठी संबंधित जिल्हा समन्वयकांशी संपर्क साधावा, असे आवाहन महामंडळामार्फत करण्यात येत आहे, अशी माहिती सोलापूर जिल्हा समन्वयक, योगेश वाघ यांनी दिली आहे.